पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९

**उमेदवारांचे नियुक्ती आदेश प्रसिध्द करणेबाबत.**

पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ मध्ये अंतिम निवड यादीत (FINAL SELECTION LIST) गुणवत्तेनुसार निवड झालेल्या एकुण-६१ उमेदवारांपैकी ५९ उमेदवार त्यांचे वर्तणुक पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल व वैद्यकीय तपासणीमध्ये पात्र ठरले असल्याने पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश उमेदवारांच्या माहितीकरीता www.palgharpolice.gov.in व मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येत आहेत.

१६/१२/२१

(दत्तात्रय शिंदे)

अध्यक्ष, पालघर जिल्हा पोलीस भरती

तथा पोलीस अधीक्षक,पालघर

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल,

पालघर

Scanned with CamScanner

जा.क्र. पोअपा/आस्था-१/पो.शिपाई/पो.भ.-२०१९/नियुक्ती/२०२१/452
पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
नवीन प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, कोळगांव
पालघर (प.) जिल्हा पालघर - ४०१४०४
दुरध्वनी – ०२५२५-२५११००( कार्यालय)
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in
दिनांक :-१८ /१२/२०२१

विषय :- पोलीस शिपाई पदावर नियुक्तीबाबत...

संदर्भ :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम – २०११ मध्ये दि.१८/०१/२०१९ रोजीची सुधारणा व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र. क्र.३१/१६-अ, दि.३१/०५/२०२१

-----ooo-----

**आदेश :-**

पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरणेसाठी पोलीस शिपाई भरती- सन-२०१९ आयोजित करण्यांत आली होती. सदर पोलीस भरतीमध्ये गुणवत्तेनुसार व प्रवर्गनिहाय खालील उमेदवारांची निवड केली आहे. चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या खालील नमूद उमेदवार यांची रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदावर दि.20/१२/२०२१ पासून खालील अटींवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर नियुक्ती केलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना सातव्या वेतन आयोगातील पोलीस शिपाई पदाच्या सुधारीत वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर एस-७ : रु.२१७००-६९१००/- व विशेष वेतन रु.७५०/- (अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते) या वेतन संरचनेतील प्रारंभिक वेतन रु.२१७००/- अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | चेस्ट नंबर | उमेदवारांचे संपुर्ण नाव | मुळ प्रवर्ग | भरती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | 372 | सुरज बजरंग जंगाळे | VJ-A | Open |
| २. | 248 | बाबुराव कल्याण इंदुलकर | EWS | Open |
| ३. | 355 | रमेश जयवंत शिंदे | EWS | Open |
| ४. | 258 | अभिजीत सुरेश वाळुंज | EWS | Open |
| ५. | 49 | इंद्रावणी अशोक गडदे | NT-C | Open |
| ६. | 386 | समाधान संतोष रोकडे | OBC | Open |
| ७. | 402 | अल्तमश अब्रार शेख | EWS | Open |
| ८. | 367 | रमेश अजीनाथ खेडकर | NT-C | Open |
| ९. | 540 | अश्विनी भाऊसाहेब सद्गीर | NT-C | Open |
| १०. | 323 | कृष्णा बजरंग बिडगर | NT-C | Open Project Affected |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | 573 | श्यामराव यशवंत क-हाडे | NT-C | Open Ex-Serviceman |
| १२. | 577 | महेश बाळासाहेब कोळपे | NT-C | Open Ex-Serviceman |
| १३. | 397 | अंकुश दामू केसकर | NT-C | Open Sports Person |
| १४. | 543 | कविता जीभाऊ मोरे | NT-C | Open |
| १५. | 580 | शिवाजी विश्वनाथ विंचू | NT-D | Open Ex-Serviceman |
| १६. | 545 | काजल किष्णा हजारे | NT-C | Open |
| १७. | 516 | नवनाथ भाऊसो ठिकोळे | NT-C | Open Home Guard |
| १८. | 60 | वैशाली बाबुसिंग आडे | VJ-A | Open |
| १९. | 537 | उज्वला जयवंत मुंढे | NT-C | Open |
| २०. | 206 | जयेश प्रकाश अलोने | SC | SC |
| २१. | 220 | बालाजी महादेव खराडे | SC | SC |
| २२. | 35 | प्रल्हाद अभिमनू मुळे | SC | SC |
| २३. | 156 | अंदाज काळुराम गायकर | SC | SC |
| २४. | 171 | शशिकांत मांगो शेवाळे | SC | SC |
| २५. | 83 | चंद्रकांत सुरेश सोनावणे | SC | SC Ex- Servicman |
| २६. | 46 | दिपाली रमेश ओव्हाळ | SC | SC |
| २७. | 463 | वैशाली नाना पठारे | SC | SC |
| २८. | 29 | राजन विकल नरशे | ST | ST |
| २९. | 205 | अनिल कृष्णा धांगडा | ST | ST |
| ३०. | 59 | हर्षदा सदू कामडी | ST | ST |
| ३१. | 92 | जयराम गणपत नडगे | ST | ST Ex-Serviceman |
| ३२. | 362 | राहूल महाजन जारवाल | VJ-A | VJ-A General |
| ३३. | 162 | अर्जुन बंडू बरवाल | VJ-A | VJ-A |
| ३४. | 333 | गणेश काशिनाथ राठोड | VJ-A | VJ-A |
| ३५. | 41 | अनिता प्रभाकर जाधव | VJ-A | VJ-A |
| ३६. | 358 | शाम युवराज धनगर | NT-C | NT-C |
| ३७. | 343 | अनिल विठ्ठल शेजाळ | NT-C | NT-C |
| ३८. | 374 | वाल्मिक उत्तम कुकलारे | NT-C | NT-C |
| ३९. | 597 | आदिनाथ महादेव वाघमोडे | NT-C | NTC Project Affected |
| ४०. | 470 | सोनाली हौसिराम शेळके | NT-C | NTC |
| ४१. | 466 | सविता यशवंत माने | NT-C | NTC |
| ४२. | 596 | रविंद्र भिमा धुरगुडे | NT-C | NTC Home Guard |
| ४३. | 676 | किरण प्रल्हाद वारखेडे | NT-C | NTC |
| ४४. | 579 | पुंडलिक भिमराव नाईकवाडे | NT-C | NTC Ex-Serviceman |
| ४५. | 574 | व्यंकट शिवाजी बनसोडे | NT-C | NTC Ex-Serviceman |
| ४६. | 180 | सुदर्शन दशरथ घुगे | NT-D | NT-D |
| ४७. | 353 | बंडू अर्जुन ढाकणे | NT-D | NT-D |
| ४८. | 673 | विदया प्रभू नेहरकर | NT-D | NTD |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४९. | 581 | शांतीलाल सखाराम सानप | NT-D | NTD Ex-Serviceman |
| ५०. | 469 | सविता बाळनाथ दराडे | NT-D | NTD |
| ५१. | 518 | ज्ञानेश्वर वाल्मिक कोळी | SBC | SBC |
| ५२. | 550 | सोनाली मदन रावरे | SBC | SBC |
| ५३. | 157 | अक्षय दामोदर शेटये | OBC | OBC |
| ५४. | 471 | स्नेहलता दादाराव ढोरे | OBC | OBC |
| ५५. | 212 | यशवंत संजय कदम | EWS | EWS |
| ५६. | 67 | राहूल नानासाहेब वायकर | EWS | EWS |
| ५७. | 377 | राहूल वसंतराव गाढवे | EWS | EWS |
| ५८. | 533 | गीताजंली किसनराव ठेंगडे | EWS | EWS |
| ५९ | 455 | शितल देविदास पवार | EWS | EWS |

वरील पोलीस शिपाई यांची नियुक्ती खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. सदर उमेदवारांची नेमणुक ही पुर्णतः हंगामी, तात्पुरत्या स्वरुपाची असुन, सदरची नियुक्ती ही पोलीस भरतीवेळी सादर केलेल्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या सत्यता पडताळणीचे अधिन राहून करण्यांत येत आहे. भविष्यात त्यांनी सादर केलेले कोणतेही कागदपत्रे/प्रमाणपत्र खोटे असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती रद्द करण्यांत येईल. तसेच शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्याने कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना न देता त्यांना केव्हाही सेवेतुन सेवामुक्त करण्यांत येईल.

१) सदर नियुक्ती ३ वर्षाकरीता अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपाची राहील. तसेच विहित परिक्षांमध्ये उत्तीर्ण होवून प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करावा लागेल. जर विहित संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२) प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. प्रशिक्षण काळात जर त्यांची वर्तणुक गैरशिस्तीची आढळुन आल्यास त्यांना सेवेतून कमी करण्यांत येईल.

३) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आलेली असल्याने जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील. महाराष्ट्र अनुसुचित जाती , अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

४) ज्या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती करण्यात आले आहे तो घोषीत केलेला प्रवर्ग सेवाकालावधीत बदलता येणार नाही.

Scanned with CamScanner

५) मागास वर्गीय उमेदवारांची गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातुन निवड झाली असली तरी, सदर उमेदवारांस त्याचे प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदोन्नती पदावर पदोन्नती मिळण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचे प्रवर्गातील आरक्षित पदावर त्यांना पदोन्नतीचा लाभ देय ठरणार नाही.

६) चारित्र्य व वर्तणुकीबद्दलच्या पडताळणीसाठीचा साक्षांकन नमुना फॉर्म भरतांना त्यामध्ये उमेदवारांने स्वहस्ताक्षरात नमूद केलेली माहिती खरी (सत्य) असली पाहिजे. खोटी माहिती भरुन दिल्याचे पडताळणीमध्ये निदर्शनास आल्यास तसेच शैक्षणिक प्रमाणपत्र व जातीचे दाखले व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही खोटी माहिती असल्याचे आढळल्यास अशा अंमलदारांची सेवा कोणतेही कारण अथवा नोटीस न देता समाप्त करण्यात येईल.

७) प्रशिक्षण कालावधीत उमेदवारास कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा उमेदवारास कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

८) प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांमध्ये कोणत्याही प्रकारचा दोष आढळल्यास किंवा प्रशिक्षण करण्यास हेतु पुरस्कर टाळाटाळ केल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास पोलीस नियमावली भाग-१ मधील नियम क्र. ७८ (१) (VIII) नुसार किंवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्यात येईल.

९) नियुक्ती स्विकारल्यानंतर पदाचा राजीनामा दिल्यास पुर्न:नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१०) पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांस पोलीस नियमावली,१९९९-भाग-३ मधील नियम ४० अन्वये विहित केलेली कर्तव्य पार पाडावी लागतील.

११) पालघर जिल्हा पोलीस घटकामध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकात आंतरजिल्हा बदली संदर्भात शासन निर्णय क्र. संकिर्ण- १०१७/ ३८४३/ प्र. क्र. -४६९/ पोल-५ ब, दि.२६/१०/२०१७ रोजीचे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२) पोलीस शिपाई पदावर रुजू झाल्या तारखेपासून ३ महिन्याचे आत उमेदवारांने महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दि.२०/११/१९८० नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र दरवर्षी स्वत:हून भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

१३) नियुक्ती केलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दि.०१/११/२००५ किंवा त्यानंतर त्यांच्या शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर **''नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना''** लागू ठरेल. त्यांना सद्या अस्तिवात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे-अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१४) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दि.२६/०९/२०११ व अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. प्रशि/ पोशि-

Scanned with CamScanner

भरती/प्रशि/खर्च/वसुली/२०१२/२२३१,दि.२६/०४/२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर ३ वर्षात पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास किंवा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवारावर झालेला प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षण खर्च प्रतिमहा रु.२०००/- प्रमाणे वसुल करुन सरकार जमा करण्यात येईल. तसे हमीपत्र उमेदवारांने देणे बंधनकारक राहील.

१५) महाराष्ट्र पोलीस सेवा प्रवेश नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व सदर प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणारी परिक्षा ४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर त्यांनी ४ संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण केली नाही, तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१६) उमेदवार महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अगर सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सुट देण्यात येईपर्यंत वेतनवाढ रोखण्यास ते पात्र ठरतील.

१७) (अ) या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम, मुंबई पोलीस अधिनियम-१९५१, मुंबई पोलीस नियमावली-१९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील. सदर नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

(ब) सदर उमेदवारास सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजा, सेवानिवृत्ती, वेतन व भत्ते इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू राहतील. तसेच शासनाने वेळोवेळी अंमलात आणलेले नियम व त्यामधील तरतुदी लागू राहतील.

१८) उमेदवारास सेवापुस्तकात/सेवापटात नोंदविलेल्या जन्मतारखेत फेरबदल करावयाचा असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासून ५ वर्षाच्या कालावधीत योग्य त्या पुराव्यासह सक्षम प्राधिकारणा मार्फत शासनाकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सादर केलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

१९) उमेदवारास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घेणे बंधनकारक राहील.

२०) शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक आरसीटी-०३१२ /प्र. क्र. २२८/ पुर्न:बांधणी- १६६/ पोल-५ अ, दि.११/०८/२०१६ अन्वये तसेच अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. प्रशिक्षण/पोशि-भरती/ सेवाप्रवेश/ नियम-सुधारणा/ ३६/ २०१६/ ४३९१, दि.०७/१०/२०१६ अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ३ (१) (ड) मध्ये केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवारांने

Scanned with CamScanner

नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर २ वर्षाच्या आत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. जर एखादया उमेदवाराने चालक पोलीस शिपाई पदाचे कर्तव्य नाकारले, तर त्याच्या कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती दिलेल्या सर्वच उमेदवारांना चालक प्रशिक्षण देण्यात येवून त्यांना चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.

२१) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारास उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

२२) नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षाच्या आत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२३) नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांनी त्यांच्या पुर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येईल.

२४) नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यासाठी आवश्यक त्या बाबींची फेरतपासणी केल्यास तसेच क्रिडा प्रमाणपत्रांचे फेर पडताळणीमध्ये ती अवैध्य असल्याचे आढळुन आल्यास तसेच किमान विहित पात्रता नसल्याचे दिसुन आल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता कोणत्याही टप्प्यावर सेवा समाप्त करण्यात येईल.

२५) वरील सर्व अटी व शर्ती आपणास मान्य असून सदर नियुक्ती स्विकारत असल्याबद्दल व सदर आदेश प्राप्त झाल्याबाबत, आदेशाचे दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी करुन ती नियुक्ती प्राधिकाऱ्यास परत देण्यात यावी.

२६) वरील नमूद उमेदवार यांनी सदरचे आदेश प्राप्त होताच तात्काळ राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पालघर येथे रहावे. हजर न झालेल्या उमेदवारांची झालेली निवड आपोआप रद्द होईल यांची नोंद घ्यावी.

16/1/21

( दत्तात्रय शिंदे )
**पोलीस अधीक्षक, पालघर**

प्रति,

**सर्व संबंधीत उमेदवार.**

**प्रत :-१) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पालघर.**

२/- उक्त आदेशाच्या अनुषंगाने वरील नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना पोलीस मुख्यालयात हजर करुन त्यांची नोंद आपले हजेरी पटावर करावी. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना सर्व किट संरजाम किट पेटीसह अदा करावा. तसेच त्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया अथवा इतर राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज दयावी.

**२) प्रमुख लिपीक, लेखाशाखा, पालघर.**

३/- शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये दि.०१/११/२००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने अंतर्गत विहीत नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्त्यांची आकारणी करावी.

**३) प्रमुख लिपीक, आस्थापना शाखा, पालघर (जिल्हा पोलीस राजपत्र प्रसिध्दीकरीता)**

**४) आस्थापना शाखा-६ व ९ लिपीक**

Scanned with CamScanner